REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 1 | OCTOBER - 2018

# रा. रं. बोराडे यांच्या कादंबरीतील ग्रामीण जीवन जाणीवा

अरविं दविजय हंगरगेकर

**प्रास्ताविक :**

आधुनिक साहित्याच्या उत्तरार्धात मराठीमध्ये ग्रामीण स्वरूपाचे साहित्य लिहिले गेले. या ग्रामीण साहित्यातून ग्रामीण जीवनातील जीवन जाणीव लेखकाने अभिव्यक्त करण्यास प्रारंभ केला. याला सामाजिक, सांस्कृतिक कारणेही जबाबदार आहेत. महात्मा फुले यांच्या रूपाने शिक्षणाच्या क्षेत्राचा विकास आणि विस्तार झाला. त्यामुळेच ग्रामीण जीवनाकडे पाहण्याची एक दृष्टी लेखकाकडे निर्माण झाली आणि त्यामुळेच ग्रामीण साहित्याचा एक वेगळा विचार मराठी साहित्यामध्ये रूढ होत गेला.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात मराठी कादंबरीमध्ये ग्रामीण जीवनाचे चित्रण वेगवेगळ्या प्रदेशाच्या अनुषंगाने झाले परंतु सशक्त अशी ग्रामीण कादंबरी म्हणता येईल अशी कादंबरी येण्यासाठी मात्र व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'बनगरवाडी' या कादंबरीची वाट पहावी लागली. या कादंबरीने ग्रामीण कादंबरी लेखनाची प्रवृत्ती ग्रामीण कादंबरीकरांमध्ये जागृत केली आणि तिथून पुढे मराठीमध्ये अस्सल ग्रामीण जीवनाचे अनुभव व्यक्त करणाऱ्या कादंबऱ्यांचे लेखन होऊ लागले.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात ग्रामीण साहित्याचा सवतासुभा निर्माण झाला. या प्रारंभीच्या कालखंडातील एक महत्त्वाचे ग्रामीण कादंबरीकार म्हणून रावसाहेब रंगनाथ बोराडे यांचा नामोल्लेख केला जातो. बोराडे यांनी ग्रामीण कादंबरी वेगवेगळ्या अंगांनी परिपूर्ण केली. त्यांच्या कादंबऱ्या अस्सल ग्रामीण जीवनाचे वास्तव दर्शन घेऊन आल्या. त्याचबरोबर विशेषतः मराठवाड्यात बोलल्या जाणाऱ्या बोलीभाषेतून या कादंबऱ्या लिहिल्या गेल्यामुळे तिच्यातील सकसता अधिक वाढलेली पहावयास मिळते.

ग्रामीण जीवनाची समग्र अभिव्यक्ती करणाऱ्या रा. रं बोराडे यांच्या विविध कादंबरी लेखनातून ग्रामीण जीवनाच्या जाणीवा अत्यंत प्रगल्भतेने अभिव्यक्त झालेल्या आहेत. त्यांनी ग्रामीण जीवनातील मूलभूत प्रश्नांना हात घालण्याचे काम आपल्या कादंबरी लेखनातून केलेले आहे. या प्रस्तुत शोधनिबंधाच्या अनुषंगाने रा.रं. बोराडे यांच्या कादंबरी लेखनातून साकार झालेल्या ग्रामीण जीवन जाणिवांचा विविधांगी विचार खालीलप्रमाणे मांडता येईल.

**रावसाहेब रंगनाथ बोराडे: सशक्त ग्रामीण कादंबरीकार :**



स्वतंत्र मराठी ग्रामीण साहित्याची चळवळ ज्या कालखंडात उभी राहिली त्याच कालखंडात बोराडे यांनी आपल्या लेखनास प्रारंभ केलेला होता. या साहित्य चळवळीच्या निमित्ताने बोराडे यांनी आपले विचार कादंबरी लेखनाच्या माध्यमातून अभिव्यक्त करण्यास प्रारंभ केला. स्वतः बोराडे ग्रामीण

शेतकरी कुटुंबातील असल्यामुळे या ग्रामीण जीवनाशी बालवयापासूनच त्यांची नाळ जोडली गेली होती. शेतीमातीचे प्रश्न त्यांनी स्वतः बालवयापासून अनुभवलेले होते. या वर्तुळातील माणसांचं जगणं मराठी साहित्यातून तेवढ्या परिणामकारकतेने अभिव्यक्त झाले नाहीत याची जाणीव अधिक समृद्ध होत गेली आणि त्याच प्रेरणेने बोराडे यांनी आपले अनुभव कादंबरीच्या निमित्ताने व्यक्त केले. बोराडे यांची कादंबरी ग्रामीण जीवनातील विविधतेशी अशाप्रकारे जोडली गेली आहे ते सांगताना दादा गोरे लिहितात, " ग्रामीण जीवनातील सुखदुःख, तेथील समस्या आणि विशेषतः नातीगोती यामुळे निर्माण होणारे प्रश्न, ताणतणाव यांचे जाणीवपूर्वक चित्रण बोराडे यांच्या कादंबरीलेखनातून साकार झालेले दिसते. ग्रामीण जीवनाचा वेध बोराडे जाणीवपूर्वक घेतात. तिथल्या जीवनासंबंधीच्या चिंतनातून बोराडे यांची कादंबरी उभी राहाताना दिसते"१ ग्रामीण माणसाच्या जगण्यातील मूलभूत प्रश्नांना जाणीवपूर्वकतेणे बोराडे यांनी स्पर्श केलेला होता हे गोरे यांच्यावरील विधानावरून स्पष्ट होते.

ग्रामीण माणसांच्या जीवनाशी बालवयापासून जोडले गेलेले बोराडे यांनी त्यांच्या 'पाचोळा, सावट, चारापाणी, आमदार सौभाग्यवती, रहाटपाळणा, इथे होतं एक गाव, मरणदारी, नामदार श्रीमती, वळणाचे पाणी, रिक्त अरिक्त' अशा विविध दहा कादंबऱ्यांच्या माध्यमातून आपला ग्रामीण जीवन अनुभव प्रभावीपणे शब्दबद्ध केला आहे. कादंबरी हा साहित्यप्रकार जीवनाचा व्यापक पट मांडण्यासाठी सहाय्यभूत ठरत असल्यामुळे या साहित्यप्रकारातून अनेक लेखकांनी वेगवेगळ्या प्रश्नांना शब्दबद्ध केले आहे. या प्रवाहातील बोराडे यांचे स्थान निश्चितच ग्रामीण जीवन जाणिवांच्या अनुषंगाने मला महत्त्वाचे वाटते. ते कादंबरीच्या माध्यमातून दिवसेंदिवस ग्रामीण जीवनाची होत चाललेली गळचेपी आणि त्यातून ग्रामीण माणसाच्या वाट्याला येत जाणारे भनंग स्वरूप शब्दबद्ध करतात. शहरीकरणाचा ग्रामीण जीवनावर होऊ लागलेला परिणाम आणि हळूहळू ग्रामीण माणसांची शहराकडे वाढत जाणारी ओढ यातून उद्ध्वस्त होत जाणारी गावखेडी ही बोराडे यांना अस्वस्थ करतात आणि म्हणूनच या संवेदनेतून साकार झालेली कादंबरी ही ग्रामीण जीवन जाणिवांचा प्रभावी अविष्कार करणारी प्रभावी कादंबरी वाटते.

## शेती, शेतकरी आणि शेतमजूर यांच्या विषयीच्या जाणीवा :

ग्रामीण जीवन जाणिवांना शब्दबद्ध करताना प्रामुख्याने शेती व शेतकरी, शेतमजुरांचे विश्व या सूत्रातून बोराडे यांची कादंबरी ग्रामीण जाणीवांचा आविष्कार करते. कृषी केंद्रित ग्रामीण जीवनाविषयीचे चिंतन बोराडे यांच्या कादंबरीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे असे मला वाटते. बदलत्या काळाच्या ओघात शेतकऱ्यांच्या वाट्याला येत जाणारे दुःख आणि त्याची होत जाणारे दमछाक या अस्वस्थतेतून आलेल्या कादंबऱ्या अत्यंत विचारप्रवृत्त करतात. बोराडे यांच्या कादंबरीतील या जाणीवाविषयी डॉ. वासुदेव मुलाटे यांनी मांडलेले मत या अनुषंगाने मला महत्त्वाचे वाटते. ते लिहितात, " ग्रामीण साहित्याच्या निमित्ताने त्यांनी ग्रामीण जीवन, विशेषतः कृषी जीवनासंबंधाने केलेले चिंतन महत्त्वाचे आहे. एकूण शेतकऱ्यांचे जीवन दिवसेंदिवस कष्टमय व बिकट होत चालल्याचे त्यांना जाणवते. रात्रंदिवस शेतीत दमछाक होईपर्यंत आणि साऱ्या कुटुंब कविल्यासह राबूनही त्यांची आर्थिक परिस्थिती बिघडत चालली आहे. अर्थात याला कारण जसे शासन आहे तसाच निसर्गही आहे. निसर्गाची साथ मिळेल याची कुठलीही शाश्वती शेतकऱ्याला वाटत नाही. कधी पाऊस वेळेवर येत नाही. आला तरी तो पुरेसा येत नाही. त्यामुळे शेतकऱ्याच्या पीकांबरोबरच त्याच्या आशा-आकांक्षाही तो खुरचटून टाकतो. त्याचा जगण्याचाच प्रश्न निर्माण होतो."२ ग्रामीण जीवन हे पूर्णतः शेती व्यवसायावर अवलंबून आहे आणि शेती व्यवसाय हा निसर्गावर अवलंबून आहे. निसर्गाचा असमतोल झाला तर ग्रामीण जीवनाचा समतोल ढळतो व त्याचा परिणाम सबंध शेतकरी व शेतमजुरांच्या जीवनावर होतो आणि त्यांच्या

जगण्याचा प्रश्न निर्माण होतो? या महत्त्वाच्या आणि दुर्लक्षित अशा विषयाकडे बोराडे यांची कादंबरी वाचकांना घेऊन जाते. ती कादंबरी ग्रामीण जाणीवांच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण ठरते.

## विविध ग्रामीण प्रश्नाविषयीच्या जाणीवा :

मराठी साहित्यापासून कायम दुर्लक्षित राहिलेला एक महत्त्वाचा घटक म्हणजे ग्रामीण जीवनातील स्त्री. शेती आणि शेतकरी तसेच ग्रामीण जगणं हे अनेकांच्या कादंबरी लेखनाचे विषय झाले. परंतु ग्रामीण भागातील स्त्री ही या वर्तुळातील एक महत्त्वाचा घटक आहे याकडे मात्र अनेकांनी दुर्लक्ष केलेले दिसून येते. या अनुषंगाने बोराडे यांच्या कादंबरीचा विचार करता बोराडे मात्र ग्रामीण जीवनातील स्त्रीला आपल्या कादंबरीतून ठळकपणे व्यक्त करतात. तिच्या जगण्याविषयीच्या आणि संघर्षाविषयीच्या जाणीवा शब्दबद्ध करताना बोराडे यांच्या कादंबरीतून साकार झालेल्या विविध स्त्री व्यक्तीरेखा ग्रामीण जीवनातील जगण्याचं प्रतिनिधित्व करताना दिसून येतात. या स्त्रिया परिस्थितीशी संघर्ष करताना हातबल न होता लढत राहतात. आपल्या नवऱ्याच्या हातात हात देऊन येणाऱ्या प्रत्येक संकटाशी सामना करण्याची ताकद असणाऱ्या या स्त्रिया अनेक कादंबऱ्यातून साकार झालेल्या आहेत. या स्त्री जीवन जाणीवांच्या अनुषंगाने बोराडे यांची निरीक्षण दृष्टीही तेवढीच महत्त्वाची आहे.

त्याचबरोबर ग्रामीण जीवनातून राजकीय बदलाचे उमटलेले पडसाद, राजकारणातल्या वृत्ती प्रवृत्तीचा व्यापकपणे वेध बोराडे यांनी घेतलेला आहे. राजकारण आता गावातील घराघरापर्यंत पोहोचले आहे. स्रीयाही राजकीय जीवनाकडे आकर्षित झाल्या आहेत. आरक्षणामुळे स्त्री आता राजकारणाच्या केंद्रवर्ती आलेली आहे. ही भूमिका ग्रामीण स्त्रियांच्या जीवनाभोवती कशा पद्धतीने विणली जात आहे याचेही चिंतन बोराडे यांच्या कादंबरीतून व्यक्त झाले आहे. या वेगवेगळ्या जीवन जाणिवांना घेऊन बोराडे यांची कादंबरी कशी अभिव्यक्त होते याविषयी आपले मत मांडताना भीमराव वाघचौरे लिहितात, " बोराडे यांच्या कादंबऱ्यांचा आवाका फारसा व्यापक नसला तरी एक प्रतिभावत लेखक म्हणून त्यांच्या अनुभवाला व्यापकता प्राप्त होत जाते. मानवी मनाचा विविधांगी पटच त्यांना या निमित्ताने उकलून दाखवायचा असतो. या मनांनी जपलेल्या प्रथा- परंपरा, संस्कार- संस्कृती इ. मूल्यांचे पापुद्रे उलगडून दाखवयाचे असतात. या पापुद्र्यातूनच संघर्षशील मानवी वृत्ती-विकारांचे दर्शन घडवायचे असते. याचं जाणिवेतून त्यांच्या कादवऱ्यांची निर्मिती झालेली आहे, असे दिसते."३ वाघचौरे यांनी बोराडे यांच्या कादंबरीतून विविध जाणीवांचा परामर्श कशा पद्धतीने घेतला गेला आहे हे स्पष्ट होते.

## वाङ्मयीन विशेषातून साकार झालेल्या जीवन जाणिवा :

बोराडे यांनी आपल्या कादंबरी निर्मितीतून आशयाचे वैविध्य जसे जोपासले आहे, ज्या पद्धतीने वेगवेगळ्या व्यक्तीरेखांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू शब्दबद्ध केले आहेत तसेच त्यांच्या कादंबरी लेखनातून विविध वाङ्मय विशेषही त्याच जाणिवेतून आलेले आहेत. ग्रामीण भागात बोलली जाणारी बोलीभाषा विशेषतः मराठवाडा परिसरातील भाषेचा कलात्मक वापर बोराडे यांनी आपल्या कादंबरीच्या अभिव्यक्तीसाठी केलेला असल्यामुळे कादंबरीच्या आशयाची परिणामकारकता वाढलेली आहे. त्या त्या व्यक्तिरेखेच्या तोंडून येणाऱ्या बोलीभाषेतील शब्दांमुळे तो अनुभव अधिक संपन्न होताना पहावयास मिळतो. म्हणून बोराडे यांच्या कादंबरीतून ग्रामीण जीवनाच्या जाणीवा शब्दबद्ध होताना वाङ्मयीन अर्थाने आलेले वेगळेपणही तेवढेच महत्त्वाचे ठरते. कोणत्याही लेखकाला आपल्या अनुभवाची अभिव्यक्ती करताना भाषा हे माध्यम अत्यंत महत्त्वाचे ठरते. अनुभवाची

व्यापकता व परिणामकारकता सिद्ध करण्यासाठी लेखकाचे महत्त्वाचे साधन म्हणजे त्याची भाषा असते आणि त्या भाषेचा ज्या कलात्मकतेने लेखक वापर करतो त्यावरून त्याच्या अभिव्यक्तीचे स्वरूप ठरत असते. या अनुषंगाने बोराडे यांच्या कादंबरीतून उपयोजिली गेलेली भाषा त्यांच्या अनुभवांना व जाणीवांना वेगळेपण देणारी आहे.

बोराडे आपल्या कादंबरी लेखनातून ज्या भौगोलिक प्रदेशाचे वर्णन करतात, त्या भौगोलिक प्रदेशातील शब्दाविष्कार हा त्यांच्या लेखनातून झालेला आहे ही त्या लेखकाची अपरिहार्यता असते. अनुभवाची सखोलता आणि अनुभवाचे वेगळेपण ठळक करण्यासाठी लेखकाला त्या त्या भौगोलिक प्रदेशातील शब्द उपयोजने नितांत गरजेचेच असते. बोराडे यांच्या 'पाचोळा' या कादंबरीचा या अनुषंगाने आवर्जून उल्लेख करावा लागेल. ही कादंबरी प्रामुख्याने ग्रामीण बोलीभाषेतून आलेली कादंबरी आहे. लेखकाच्या या भाषिक अभिव्यक्तिच्या अपरिहार्यतेच्या अनुषंगाने आपले मत नोंदवताना मोहन पाटील यांनी म्हटले आहे, " ग्रामीण साहित्यात जी भाषा आलेली असते. ती त्या लेखकाची, तिथल्या प्रदेशाची भाषा असते. लेखक ज्या स्तरातून जात वा वर्ग असा आलेला असतो त्याचे संस्कार आणि ज्या परिसरात तो वाढलेला असतो त्या परिसरातल्या भाषाव्यवस्थेचे परिणाम त्याच्या व्यक्तित्त्वावर खोलवर असतात. तीच भाषा अनुभवसंचिताने त्याच्या साहित्याची भाषा बनलेली असते. नव्हे तर तशी भाषा वापरणे ही त्याची अपरिहार्यता होऊन बसते. त्या भाषेतील विशिष्ट शब्द, ढब वापरल्याशिवाय त्याला अनुभवाचे चित्रिकरण आणि दृश्यात्मका, भावभावना त्याला व्यक्त करता येत नाहीत. तो जरी प्रमाण भाषेत निवेदन करू लागला तर ज्या वातावरणाबद्दल तो सांगतो आहे. त्या वातावरणातील भाषेचे कण प्रमाणभाषेलाही चिकटतात. ही सुद्धा लेखकाची निकड होऊन बसते. कारण भाषेचा वापर अशावेळी पिंडधर्मी भाषिक संस्कारातून होत असतो. त्यामुळे त्याच्या साहित्यकृतीमध्ये अपरिहार्यतेनेच अपरिचितता येऊ लागते. लेखकाच्या बाजूने पाहिले तर ही गोष्ट योग्यच म्हणावी लागते."४ ग्रामीण जीवनानुभव अभिव्यक्त करताना त्या त्या भाषेतील शब्द वापरल्याशिवाय त्या लेखकाच्या अनुभवाला दृष्यात्मकता व ती भावना प्राप्त होत नाही. म्हणूनच त्याला बोलीभाषेचा उपयोग आपल्या अभिव्यक्तीसाठी करावा लागतो. हे मोहन पाटील यांनी स्पष्ट केले आहे. यालाच धरून मला असे म्हणावे असे वाटते की, लेखकाच्या जाणीवांनाही त्या व्यक्तीचे नेमकेपण भाषेच्या माध्यमातूनच प्राप्त होत असते. त्यामुळे ती भाषा लेखकाला उपयोजने अपरिहार्य होऊन जाते.

सरतेशेवटी सारांश रुपाने असे सांगता येते की, बोराडे यांनी ग्रामीण संस्कृतीला कवेत घेऊन ग्रामीण जीवन आणि त्या जीवनातील जाणीवा केंद्रस्थानी ठेवून आपल्या कादंबरी शब्दबद्ध केल्या आहेत. बोराडे यांच्या एकूणच कादंबरी लेखनातून ज्या जाणीवा अभिव्यक्त होतात त्या बोराडे यांच्या संवेदनशील मनाचे प्रतीक आहेत असे मला वाटते. या जीवन जाणीवा अभिव्यक्त करताना ग्रामीण जीवनातील वेगवेगळ्या अंगांना स्पर्श करून बोराडे यांनी मूलभूत प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या कादंबरी लेखनातून व्यापक जीवन जाणिवा अभिव्यक्त होत नसल्या तरी मूलभूत आणि महत्त्वपूर्ण जाणीवांचा अविष्कार करण्यात यशस्वी झाले आहेत हे मात्र निश्चितच मान्य करावे लागते.

## संदर्भ :

१) दादा गोरे, रा. रं. बोराडे शिवारातला शब्दशिल्पकार संपा. द. ता. भोसले, अथर्व पब्लिकेशन,धुळे, प्र. आ. २०१६, पृष्ठ २८.

२) वासुदेव मुलाटे, ग्रामीण साहित्य: चिंतन आणि चर्चा, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. २००५, पृष्ठ २४५,२४६

३) भीमराव वाघचौरे, रा. रं. बोराडे साहित्य आणि स्वरूप, विहित प्रकाशन, औरंगाबाद,प्र. आ. १९९९, पृष्ठ १६१,१६२.

४) मोहन पाटील, ग्रामीण साहित्य आणि संस्कृती, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, दु. आ. २००८,पृष्ठ १५०.